■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. ३० जुलै २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ५३ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

# महायुती सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय | कोयना धरण

# ‘छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर’ नावाने ओळखले जाणार



## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती

● **अहिल्यानगर | वीरभूमी–** पश्चिम महाराष्ट्राला वरदान ठरलेल्या कोयना जलसागराचे छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर असे नामांतर करण्याचा महत्वपूर्ण आणि ऐतिहसिक निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने घेतला असल्याची माहीती जलसंपदा मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

कोयना जलसागरास यापुर्वी शिवाजी जलसागर या नावाने संबोधले जात होते.मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख योग्य नसल्याने नावामध्ये बदल करून छत्रपती शिवाजी महाराजांचे पूर्ण नाव कोयना जलशायला द्यावे आशी मागणी होत होती.

जलसंपदा मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील यांनी याबाबत पुढाकार घेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जलशयाचे नामांतर करण्याबाबत विनंती केली होती.

महायुती सरकारने याबाबतचा शासन आदेश जारी करून कोयना जलसागरास नाव छत्रपती शिवाजी महाराज कोयना जलसागर असे करण्याचा महत्वपूर्ण निर्णय जाहीर केल्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे यांनी सांगितले.

जलसागराचे नामांतर करण्याची शिवप्रेमी नागरीकांची मागणी आणि जलसंपदा विभागाच्या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या निर्णयाबद्दल मंत्री विखे पाटील यांनी आभार मानले आहेत.

॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे



## फोडणी

राजू घुगरे,
शेवगाव, मो. ९४२२८५६१६४

### शालार्थ

ज्ञानाचे ही पीठच होईल
इतके काढल्यावर दळून
ज्ञानगंगा उलटीच वाहणार
प्रवाह घेतल्यावर वळून
सरस्वतीच्या चरणी वाहू
कृत्रिम बनावटीची फुलं
शाळा, गुरूजी, साहेबांसह
बनावट निघालीत का मुलं

## SPOT NEWS

### लोकसभेत पेपर लीक सुधारणा विधेयक मंजूर

● **नवी दिल्ली** – लोकसभेत पेपरफुटीशी संबंधित लोक परीक्षा (अयोग्य साधनांना प्रतिबंध) सुधारणा विधेयक, २०२६ बुधवारी ध्वनी मताने मंजूर झाले. या विधेयकावर मंगळवारी ९ तास चर्चा झाली. बुधवारी विरोधकांकडून राहुल गांधींनी विधेयकावर ५० मिनिटे भाषण केले. विरोधकांच्या गदारोळात हे विधेयक मंजूर झाले. यानुसार पेपरफुटीशी संबंधित कायदे अधिक कठोर करण्यात आले आहेत. आता पेपरफुटीशी संबंधित गुन्ह्यांमध्ये जास्तीत जास्त १० वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि १० कोटी रुपयांपर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली आहे. तर राज्यसभेत राष्ट्रीय सन्मान अपमान प्रतिबंध सुधारणा विधेयक(२०२६) मंजूर झाले. आता जन-गण-मन प्रमाणे वंदे मातरमला कायदेशीर संरक्षण मिळेल. वंदे मातरमचा अपमान, अनादर करणे आणि गायनात अडथळा आणणे हा दंडनीय गुन्हा असेल. राज्यसभेने वंदे मातरमचा अपमान केल्यास हा शिक्षापात्र गुन्हा ठरवणारे विधेयक मंजूर केले आहे. हा कायदा वंदे मातरमचा अपमान करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद करतो.

### ‘एनसीएमसी’ स्मार्ट कार्डसाठी आता १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

● **मुंबई** – एसटी प्रवासात शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी ‘एनसीएमसी’ स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला आता १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप ‘एनसीएमसी’ स्मार्ट कार्ड प्राप्त झाले नसल्याने त्यांची गैरसोय होऊ नये यासाठी हा निर्णय मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. राज्य शासनाच्या वतीने अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, ज्येष्ठ नागरिकांना तसेच महिलांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत देण्यात येते. या सवलती अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी १ ऑगस्टपासून ‘एनसीएमसी’ स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, राज्यातील अनेक पात्र प्रवाशांनी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असली तरी काही ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप प्रत्यक्ष कार्ड मिळालेले नाही. त्यामुळे केवळ कार्ड उपलब्ध न झाल्याने पात्र प्रवाशांना शासनाच्या सवलतीपासून वंचित राहावे लागू नये, याची दखल प्रताप सरनाईक यांनी घेतली आहे.

# महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा

## अनेक जिल्ह्यांना ऑरेंज, गोंदियाला रेड अलर्ट

● **मुंबई | वीरभूमी–** राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने जोरदार पुनरागमन केले असून आगामी काही तासांत आणि पुढील काही दिवसांत पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने (खचऊ) व्यक्त केली आहे. मराठवाडा, विदर्भ आणि कोकण घाटमाथा परिसरातील अनेक जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट, तर गोंदिया जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा यलो अलर्ट देण्यात आल्याने प्रशासन सतर्क झाले आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुणे घाटमाथा, सातारा, रायगड, कोल्हापूर, जळगाव, धुळे, नाशिक, ठाणे, मुंबई, रत्नागिरी, वर्धा, अमरावती, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, बीड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. अनेक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह जोरदार सरी कोसळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार छत्तीसगड आणि ओडिशा परिसरात कमी दाबाची प्रणाली अधिक सक्रिय झाली आहे. ओडिशातील संभळपूरच्या वायव्येस सुमारे ८० किलोमीटर अंतरावर डीप डिप्रेशन सक्रिय असल्यामुळे त्याचा परिणाम महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रावर होत आहे. या प्रणालीमुळे वातावरणात मोठ्या प्रमाणावर आर्द्रता निर्माण झाली असून पुढील काही तासांत राज्यभर पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

यंदाच्या मान्सूनच्या सुरुवातीला जून महिन्यात अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली होती. अनेक भागात पेरण्या रखडल्या होत्या, तर काही ठिकाणी उगवलेल्या पिकांवर संकट आले होते. मात्र जुलै महिन्याच्या सुरुवातीपासून सुरू झालेल्या जोरदार पावसाने परिस्थितीत मोठा बदल घडवून आणला आहे. जुलै महिन्यात झालेल्या दमदार पावसामुळे जून महिन्यातील पावसाची तूट मोठ्या प्रमाणात भरून निघाली असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. खरीप हंगामातील पिकांना नवसंजीवनी मिळाल्याने ग्रामीण भागात समाधानाचे वातावरण आहे.

मराठवाड्यातील नांदेड शहरासह जिल्ह्याच्या अनेक भागांत सकाळपासूनच मुसळधार पावसाने हजेरी लावली. यंदाच्या पावसाळ्यातील हा आतापर्यंतचा सर्वात मोठा पाऊस मानला जात आहे. जोरदार पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचले, तर अनेक लहान-मोठे नाले प्रथमच खळखळून वाहू लागले. शेतकऱ्यांच्या मते हा पाऊस सोयाबीन, कापूस, तूर आणि इतर खरीप पिकांसाठी अत्यंत लाभदायक ठरणार आहे. मात्र जिल्ह्यातील मोठे धरणे आणि जलसाठे पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी अजूनही काही दिवस सातत्याने पाऊस होण्याची आवश्यकता असल्याचे जलतज्ज्ञांचे मत आहे.

गोंदिया जिल्ह्यासाठी हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केला होता. दिवसभर अपेक्षित पाऊस न झाल्याने नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण झाली होती. मात्र रात्री उशिरा विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावत संपूर्ण वातावरण बदलून टाकले. या पावसामुळे धानासह खरीप पिकांना मोठा दिलासा मिळाला असून शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्ह्यात पुढील काही दिवसही पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, हवामान विभागाच्या इशाऱ्यानंतर राज्य प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अतिवृष्टीची शक्यता असलेल्या भागातील नागरिकांनी नदी, नाले आणि धबधब्यांच्या परिसरात जाणे टाळावे, तर डोंगराळ भागात भूस्खलनाचा धोका लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पावसामुळे राज्यातील तापमानात घट झाली असून सर्वत्र आल्हाददायक वातावरण निर्माण झाले आहे. आगामी काही दिवस राज्यभर पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आल्याने शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष आता हवामान विभागाच्या पुढील अंदाजाकडे लागले आहे.

### एल निनोची चिंता काहीशी कमी

■ यंदा प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाल्याने भारतातील मान्सूनवर विपरीत परिणाम होईल, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. जून महिन्यातील कमी पावसामुळे ही भीती अधिक वाढली होती. मात्र जुलै महिन्यात मान्सूनने जोरदार पुनरागमन केल्यामुळे परिस्थितीत सकारात्मक बदल दिसून येत आहे. तज्ज्ञांच्या मते, पुढील काही दिवसांतही कमी दाबाच्या प्रणाली सक्रिय राहिल्यास राज्यातील अनेक भागांत चांगला पाऊस सुरू राहू शकतो. त्यामुळे खरीप पिकांना मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.

## १ कोटी ६६ लाख पात्र महिलांची अंतिम यादी तयार

● **मुंबई | वीरभूमी–** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. राज्य सरकारने ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अखेर १ कोटी ६६ लाख पात्र महिलांची अंतिम यादी तयार केली आहे. त्यामुळे ज्या महिलांच्या ई-केवायसीमध्ये त्रुटी होत्या किंवा पडताळणी प्रलंबित होती, त्यांना आता मोठा दिलासा मिळाला आहे. ई-केवायसीनंतर ६६ लाख महिलांना वगळण्यात आले आहे.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, अर्जांची छाननी आणि ई-केवायसी पडताळणी पूर्ण झाल्यानंतरच पात्र लाभार्थ्यांचा हा आकडा निश्चित करण्यात आला आहे. आता या पात्र महिलांच्या बँक खात्यात थेट डीबीटी द्वारे हप्त्याचे पैसे जमा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जर तुम्हीही या योजनेसाठी अर्ज केला असेल, तर लगेचच अधिकृत पोर्टलवर जाऊन तुमचे नाव या अंतिम यादीत आहे की नाही, हे तपासून घ्या.

अपात्र किंवा दुबार लाभार्थ्यांना ओळखण्यासाठी आणि फक्त पात्र महिलांनाच १५०० रुपयांचा लाभ देण्यासाठी सरकारकडून ई-केवायसी प्रक्रिया राबवण्यात आली होती. त्यामुळे यापुढे लाडकी बहीण योजनेची १,५०० रुपयांची मासिक मदत पात्र लाभार्थी महिलांच्याच खात्यावर जमा होणार आहे. महिला आणि बाल विकास राज्यमंत्री मेघना सकोरे-बोर्डीकर यांनी टीओआयला सांगितले की, ही प्रक्रिया पूर्ण झाली असून लाभार्थी डेटाबेस अंतिम करण्यात आला आहे.

सर्व पडताळणी आणि ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत. छाननीनंतर, पात्र लाभार्थ्यांची अंतिम संख्या १.६६ कोटी झाली आहे. ६६ लाख लाभार्थ्यांना वगळण्यात आले कारण त्यांनी अनिवार्य ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली नव्हती, अथवा त्या अपात्र होत्या. जून महिन्याचा हप्ता या सर्व पात्र लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा झालेला आहे, असे बोर्डीकर यांनी सांगितले. पडताळणीमध्ये लाभार्थी सरकारी कर्मचारी, आयकर भरणारे किंवा इतर सरकारी योजनांचे लाभार्थी आहेत का? हे तपासणे महत्त्वाचे होते. डेटाबेसमध्ये आढळलेल्या पुरुष लाभार्थ्यांनाही वगळण्यात आले आहे, असे बोर्डीकर यांनी सांगितले. अपात्र लाभार्थ्यांना आर्थिक मदत मिळत असल्याचे समोर आल्यानंतर सरकारवर टीकेची झोड उठली होती. विरोधकांकडून यावरून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरण्यात आले होते. त्यामुळे सरकारकडून तात्काळ ई-केवायसी प्रक्रिया सुरू करण्यात आली होती.

## जरांगे पाटलांचा सरकारला अल्टिमेटम, मराठा आरक्षणाचा लढा तीव्र होणार

● **मुंबई | वीरभूमी–** मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे समाजबांधवांशी संवाद साधताना २९ ऑगस्टपासून निर्णायक आंदोलन छेडण्याची घोषणा केली आहे. सरकारने मराठा समाजाच्या मागण्यांबाबत अद्याप ठोस निर्णय घेतला नसल्याचा आरोप करत त्यांनी आंदोलनाची दिशा स्पष्ट केली आणि समाजाला मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.

जरांगे पाटील यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, गेल्या तीन वर्षांपासून मराठा समाज आरक्षणाच्या प्रश्नासाठी सातत्याने संघर्ष करत आहे. अनेक आंदोलने, उपोषणे आणि चर्चेनंतरही अपेक्षित निर्णय झाला नसल्याने आता अंतिम टप्प्यातील लढा उभारण्याची वेळ आल्याचे त्यांनी म्हटले.

मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केले की, २९ ऑगस्ट २०२६ रोजी मराठा आंदोलनाला तीन वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर त्याच दिवशी नव्या टप्प्यातील आंदोलन सुरू करण्यात येणार आहे. हे आंदोलन मागील सर्व आंदोलनांपेक्षा अधिक व्यापक आणि निर्णायक असेल, असा दावा त्यांनी केला.

त्यांच्या मते, सरकारने अनेक वेळा आश्वासने दिली, मात्र प्रत्यक्षात मराठा समाजाच्या प्रश्नांवर अपेक्षित कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे आता आंदोलनाशिवाय पर्याय उरलेला नसल्याचे त्यांनी सांगितले.

या आंदोलनाचा प्रमुख मुद्दा म्हणजे ५८ लाख नोंदींशी संबंधित प्रमाणपत्रांचे वितरण असल्याचे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. ज्या नागरिकांच्या मराठा समाजाशी संबंधित नोंदी उपलब्ध आहेत, त्यांना अद्याप प्रमाणपत्रे मिळालेली नाहीत, असा आरोप त्यांनी केला. ज्यांच्या नोंदी उपलब्ध आहेत त्यांनी तातडीने अर्ज करण्याचे आवाहनही त्यांनी केले. सरकारने या प्रक्रियेला गती देऊन पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे द्यावीत, अशी त्यांची मागणी आहे.

जरांगे पाटील यांनी आपल्या भाषणात हैदराबाद गॅझेटियरचा उल्लेख करत सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ऐतिहासिक नोंदींचा आधार मान्य केला जात असेल, तर त्यानुसार पात्र व्यक्तींना प्रमाणपत्रे देण्यास विलंब का होत आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# ‘ड्रग्स फ्री मुंबई’ मॉडेलचा राज्यभर विस्तार

## सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये ‘नशामुक्ती मार्गदर्शन व समुपदेशन समिती’ स्थापन करण्यात येणार

● **मुंबई | वीरभूमी–** आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी यांच्या नेतृत्वात संपूर्ण देशात अमली पदार्थांविरुद्ध एक मोठा लढा उभारण्यात आला आहे. याच लढ्याला महाराष्ट्रात माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अधिक बळ मिळत आहे. ‘ड्रग्स फ्री मुंबई’ अभियानाचे मॉडेल आता संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार आहे. मुंबईसह राज्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये ‘नशामुक्ती मार्गदर्शन व समुपदेशन समिती’ची स्थापना होणार आहे. माझ्या निवेदनाची दखल घेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांचे मनः पूर्वक आभार मानतो, असे नशामुक्ती जनजागृती अभियानाच्या उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष तथा कॅबिनेट मंत्री श्री. मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

या समित्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यसनांविषयी सातत्याने जनजागृती केली जाईल. विद्यार्थ्यांच्या वर्तनातील बदल वेळेत ओळखून त्यांना आवश्यक समुपदेशन उपलब्ध करून देणे, पालक व शिक्षकांमध्ये समन्वय साधणे तसेच गरज भासल्यास संबंधित तज्ज्ञांकडे मार्गदर्शनासाठी संदर्भित करण्याची जबाबदारीही या समित्यांवर असेल.





केंद्र शासनाने २०२९ पर्यंत देश अमली पदार्थमुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असून, त्यासाठी सर्व विभागांच्या समन्वयातून अमली पदार्थांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई आणि व्यापक जनजागृती करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने महाराष्ट्र शासनानेही राज्यात व्यसनमुक्तीची चळवळ अधिक प्रभावी करण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत.

३० जुलै रोजी वरळी डोम येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ’ड्रग्स फ्री मुंबई’ अभियानाचा शुभारंभ होत आहे. हा केवळ उद्घाटनाचा कार्यक्रम नसून वर्षभर चालणारी जनचळवळ आहे. या अभियानामध्ये विद्यार्थी, शिक्षक, पालक, स्वयंसेवी संस्था, मानसोपचारतज्ज्ञ, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना तसेच समाजातील विविध घटकांचा सक्रिय सहभाग निश्चित करण्यात आला आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वर्षभर विविध जनजागृतीपर उपक्रम, मार्गदर्शन सत्रे, समुपदेशन कार्यक्रम तसेच व्यसनमुक्तीविषयी संवादात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. व्यसनमुक्त महाराष्ट्र घडविण्याच्या या लोकचळवळीत विद्यार्थी, पालक, शिक्षक, स्वयंसेवी संस्था तसेच सर्व नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केले आहे.

# SPOT NEWS

## भिंगारच्या शुक्लेश्वर स्मशानभूमीच्या दुरुस्तीला सुरुवात

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

भिंगार येथील ऐतिहासिक शुक्लेश्वर मंदिर परिसरातील स्मशानभूमीच्या अत्यंत दयनीय अवस्थेविरोधात सामाजिक कार्यकर्ते जालिंदर बोरुडे यांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर छावणी प्रशासनाने तातडीने दखल घेत दुरुस्तीची कामे सुरू केली आहेत. जीर्ण झालेले पत्र्याचे शेड, तुटलेल्या जाळ्या, पडझड झालेला प्रवेशद्वार आणि अन्य सुविधांची दुरुस्ती मंगळवार (दि. २८ जुलै) पासून सुरू करण्यात आली आहे. मात्र, केवळ तात्पुरत्या दुरुस्तींवर समाधान न मानता, अहिल्यानगर शहरातील नालेगाव येथील अमरधामच्या धर्तीवर आधुनिक आणि सर्व सुविधांनी सुसज्ज आरसीसी स्मशानभूमी उभारण्याची मागणी बोरुडे यांनी केली आहे. भिंगार येथील शुक्लेश्वर मंदिर परिसरातील ही स्मशानभूमी भिंगारसह पंचक्रोशी आणि नागरदेवळे उपनगरातील हजारो नागरिकांच्या अंतिम संस्कारासाठी महत्त्वाचे केंद्र आहे. दररोज अनेक अंत्ययात्रा येथे येत असतात. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून या स्मशानभूमीची अवस्था अत्यंत बिकट झाली होती. अंत्यविधीसाठी उभारण्यात आलेले पत्र्याचे शेड पूर्णपणे जीर्ण झाले होते. अनेक ठिकाणी मोठमोठी भगदाडे पडल्याने पावसाळ्यात शेडमधून मोठ्या प्रमाणात पाणी गळत होते. परिणामी, दुःखद प्रसंगीही नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. पावसाच्या दिवसांत अंत्ययात्रा स्मशानभूमीत पोहोचल्यानंतरही पाऊस थांबेपर्यंत मृतदेहासह नातेवाईकांना प्रतीक्षा करावी लागत होती. अंत्यविधीची प्रक्रिया सुरळीत पार पाडणे अशक्य होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती. याशिवाय प्रवेशद्वाराचे लोखंडी गेट मोडकळीस आले होते, बसण्यासाठीचे ओटे वरील जाळ्या तुटलेल्या होत्या आणि परिसरात आवश्यक मूलभूत सुविधांचाही अभाव जाणवत होता. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते जालिंदर बोरुडे यांनी छावणी प्रशासनाचे लक्ष वेधून निधी उपलब्ध करून दुरुस्तीची कामे हाती घेण्याची मागणी केली होती. तसेच, वेळेत कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. त्यांच्या या भूमिकेनंतर छावणी प्रशासनाने त्वरित दखल घेत आवश्यक दुरुस्तीची कामे सुरू केली. सुरू असलेल्या कामांची पाहणीही जालिंदर बोरुडे यांनी प्रत्यक्ष जाऊन केली. बोरुडे यांनी प्रशासनाच्या तातडीच्या कारवाईचे स्वागत करताना, ही केवळ तात्पुरती उपाययोजना असल्याचे स्पष्ट केले. दरवर्षी पत्र्याचे शेड बदलणे किंवा डागडुजी करण्याऐवजी कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

## प्रा. शंकर अंदानी यांच्या 'भाऊवरील १०१ कविता' काव्यसंग्रहास ग.दि. माडगूळकर उत्कृष्ट पुरस्कार

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

मराठी आणि हिंदी साहित्य क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे साहित्यिक तथा सीए (डॉ.) प्रा. शंकर घनशामदास अंदानी यांच्या 'भाऊवरील १०१ कविता' या काव्यसंग्रहाला 'ग.दि. माडगूळकर उत्कृष्ट काव्य संग्रह पुरस्कार' प्रदान करण्यात आला. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.आषाढी एकादशी आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून निमगाव वाघा (ता. नगर) येथे आयोजित करण्यात आलेल्या 'जगतगुरू संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन' या सोहळ्यात उद्योजक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे आणि सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक रतिलाल चौधर यांच्या हस्ते सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी यांना मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला स्वागताध्यक्ष ड. आनंद सूर्यवंशी, संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे, सामाजिक कार्यकर्ते अशोक सूर्यवंशी, अनिताताई खरात, विशेष सरकारी वकील ड. सुरेश लगड, उद्योजक दिलावर शेख, निमगाव वाघा सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, डॉ. विजय जाधव, भाऊसाहेब ठाणगे यांच्यासह साहित्यप्रेमी, कवी, लेखक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी यांनी गेल्या अनेक वर्षांपासून मराठी आणि हिंदी साहित्य क्षेत्रात सातत्यपूर्ण आणि विक्रमी साहित्यनिर्मिती करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीत अनेक अभूतपूर्व विक्रमांची नोंद झाली असून, एकाच दिवशी तब्बल १०६ स्वलिखित पुस्तकांचे प्रकाशन करण्याचा जागतिक विक्रम त्यांच्या नावावर नोंदविण्यात आला आहे. याशिवाय 'आई' या विषयावर आधारित ५,१२१ कवितांचा जगातील सर्वात मोठा हिंदी काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा मानही त्यांनी मिळविला आहे. आजवर त्यांनी लिहिलेल्या १२ हजार १०० हून अधिक कवितांचे विविध ग्रंथांमधून प्रकाशन झाले असून, या साहित्यनिर्मितीची स्वतंत्र जागतिक विक्रम म्हणून नोंद करण्यात आली आहे. मराठी साहित्य समृद्ध करण्यासाठी त्यांनी अनेक वैशिष्ट्यपूर्ण संकलने प्रकाशित केली आहेत. 'वडील : बाबा अबोल जीवनाचे कोडे' या शीर्षकाखाली महाराष्ट्रातील ८० कवींच्या १,१६१ कवितांचे भव्य संकलन त्यांनी प्रकाशित केले. त्यानंतर 'बहिण माझी प्रिय ताई' या नावाने बहिणीवरील १,१६१ कवितांचा स्वतंत्र काव्यसंग्रह प्रकाशित करून कौटुंबिक नातेसंबंधांवरील साहित्याला नवे परिमाण दिले. त्याच परंपरेत 'भाऊवरील १०१ कविता' या काव्यसंग्रहातून त्यांनी भाऊ-बहिण आणि भावांमधील जिव्हाळा, प्रेम, आपुलकी, नात्यांची उब आणि भावनिक बंध यांचे प्रभावी शब्दांकन केले आहे.

### दाभोळकर घराण्याचा इतिहास उलगडणारा

# अकोळनेरच्या श्रीदत्त मंदिरातील शिलालेख

### ब्रह्मानंद स्वामींचे जीवन, संन्यास परंपरा आणि पितृभक्तीचा जिवंत ऐतिहासिक दस्तऐवज

**■ विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्ह्यातील अकोळनेर गावातील श्रीकृष्ण मंदिराजवळ असलेल्या श्रीगुरुदत्त मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावर कोरलेला १३ ओळींचा हा शिलालेख एकोणिसाव्या शतकातील धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण पुरावा ठरतो. देवनागरी लिपीतील संस्कृत भाषेत कोरलेल्या या शिलालेखाच्या शेवटच्या दोन ओळी मराठीत असून, आजही त्यावरील अक्षरे स्पष्ट व सुवाच्य आहेत.

शिलालेख

१. ।।श्री कुलदैवत लक्ष्मीकेशवाभ्यां नमः।।

२. ।।ब्रम्हानंदन स्वामी।।

३. ।।श्री गणेशायनमः ।।

४. अब्धिगुणाद्रींदुमिते दाभोलकराख्य सत्कुले जा

५. तःरामांशसंभवो यो लोकोप्रथितोस्तिकृष्णरावेति ।।१।। एकोनाष्टाशतमि

६. त वर्षेतद्धर्मचारिणी सगुणा ।। भुक्त्वासंसारसुखंयाता सौभाग्यमंडिता

७. त्रिदिव ।।२।। अतिवाह्यशुचंकृष्ण संसारभरस्वपुत्रयोर्न्यस्य .सन्य

८. स्यावजगाहे ब्रह्मानंदाख्ययाचिदानंदं ।।३।। चतुरधिकाष्टाशतमित व

९. र्षेवैशाखकृष्णप्रथमदीने ।। .शांतात्मा कृत कार्यो देहविससर्जनाक

१०. सुखाकांक्षी ।।४।। पितृभक्त्यातत्पुत्रो मोरेश्वरगणपती शुचाविष्टो।।

११. श्रीदत्तपादयुगुले पुण्यायतनं समर्पयावेदम् ।।५।। छ छ छ

१२. बापूसाहेब जहागीरदार हे अकोलनेर येथे वैशाख कृष्ण १ शके १८०४ रोजी समाधिस्त झाले.

१३. त्याच्या समाधीचे देऊळ त्याच्या चिरंजीवांनी मार्गशीर्ष शुद्ध १५ शके १८०७ रोजी बांधले.

शिलालेखाची सुरुवात श्री लक्ष्मीकेशव, ब्रह्मानंद स्वामी आणि श्रीगणेश यांच्या वंदनेने होते. त्यानंतर दाभोळकर घराण्यातील कृष्णराव उर्फ बापूसाहेब जहागीरदार यांच्या जीवनप्रवासाचे क्रमवार वर्णन करण्यात आले आहे. शके १७३४ मध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांनी धर्मनिष्ठ गृहस्थ म्हणून जीवन व्यतीत केले. पत्नी सगुणाबाई यांच्या शके १७९९ मधील निधनानंतर त्यांनी संसाराची जबाबदारी पुत्रांवर सोपवून संन्यास स्वीकारला आणि 'ब्रह्मानंद स्वामी' या नावाने आध्यात्मिक जीवन जगले.

शके १८०४, वैशाख कृष्ण प्रतिपदेला त्यांनी शांतचित्ताने समाधी स्वीकारली. त्यानंतर पुत्र मोरेश्वर गणपती यांनी





पित्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ शके १८०७ मध्ये त्यांच्या समाधीवर मंदिर उभारून ते श्रीदत्तप्रभूंच्या चरणी समर्पित केले. या घटनेची नोंद शिलालेखाच्या शेवटच्या मराठी ओळींमध्ये स्पष्टपणे करण्यात आली आहे.

या शिलालेखाचे वैशिष्ट्य म्हणजे व्यक्तिचरित्र, वंशपरंपरा, संन्याससंस्था, दत्तसंप्रदाय, पितृभक्ती आणि समाधीमंदिर स्थापनेची परंपरा यांचे एकाच लेखात दर्शन घडते. शके १७३४, १७९९, १८०४ आणि १८०७ अशा स्पष्ट कालनोंदींमुळे इतिहास संशोधकांना घटनांचा अचूक कालक्रम निश्चित करण्यास मोठी मदत होते.

संस्कृत आणि मराठी भाषेचा सुंदर संगम असलेला हा शिलालेख केवळ एका संतपुरुषाच्या स्मृतीचा लेख नसून, तत्कालीन ग्रामीण महाराष्ट्रातील धार्मिक श्रद्धा, सामाजिक मूल्ये, कुटुंबव्यवस्था आणि सांस्कृतिक परंपरांचा विश्वसनीय प्राथमिक ऐतिहासिक स्रोत आहे. शिलालेखविद्या, पुरातत्त्व, स्थानिक इतिहास आणि सांस्कृतिक वारसा यांच्या अभ्यासासाठी हा शिलालेख अत्यंत मौल्यवान मानला जातो.

या शिलालेखाचे संशोधन माहिती संकलन व वाचन पुणे येथील अनिल दुधाणे यांनी केले आहे.

अकोळनेरची संतकाव्य परंपरा विठा रेणुकानंदन, चिमणकवी आणि संत दासगणू महाराज यांच्या कार्यामुळे विशेष समृद्ध झाली. दासगणू महाराज (मूळ नाव : गणेश दत्तात्रेय सहस्रबुद्धे) यांना संतचरित्रांच्या ओवीबद्ध लेखनामुळे आधुनिक महिपती म्हणून ओळखले जाते.

श्री गजानन विजय ग्रंथात त्यांनी दांभिक गुरू, दिखाऊ भक्ती आणि बाह्य आडंबरावर कठोर प्रहार करत खरी भक्ती ही अंतःकरणातील निर्मळता, सदाचार आणि निष्काम भावात असल्याचा संदेश दिला आहे.

अशा प्रकारे अकोळनेरची कवी परंपरा ही केवळ साहित्यनिर्मितीपुरती मर्यादित नसून समाजप्रबोधन, नैतिक मूल्ये आणि भक्तीपर विचारांचा समृद्ध ऐतिहासिक वारसा जपणारी परंपरा म्हणून विशेष महत्त्वाची ठरते.

## मुकुंदनगरमध्ये गरजू विद्यार्थ्यांसाठी तवस्सुल अकॅडमी मोफत कोचिंग क्लासचा शुभारंभ

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

मुकुंदनगर परिसरातील गरजू व होतकरू मुला-मुलींना दर्जेदार शिक्षण आणि गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन उपलब्ध व्हावे या उद्देशाने तवस्सुल अकॅडमीच्या वतीने मोफत कोचिंग क्लास सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या हस्ते झाले.

यावेळी माजी नगरसेवक समद खान, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यक जिल्हाध्यक्ष साहेबान जहागीरदार, सामाजिक कार्यकर्ते खालिद शेख, एमआयएमचे जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अशरफी, विश्व मानव अधिकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष नवेद शेख, मौलाना आझादचे प्राचार्य फरजाना मिर्जा, तवस्सुल फाउंडेशनचे अध्यक्ष असीफ सय्यद, तारीक सय्यद, मोइन खान, समीर खान, सूफियान शेख, मुफ्ती अल्ताफ, अकबरअली शेख, जावेद शेख, जुनेद खान, फरहीन मोहसिन शेख यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या मोफत कोचिंग क्लाससाठी साऊथ आफ्रिकेत इंजिनिअर म्हणून कार्यरत असलेले अकिब सय्यद यांनी आर्थिक सहकार्य केले असून, त्यांच्या पुढाकारातूनच हा उपक्रम साकार झाला आहे. या अकॅडमीमध्ये मराठी, उर्दू आणि इंग्रजी माध्यमातील दहावीच्या विद्यार्थ्यांना अनुभवी आणि दर्जेदार शिक्षकांमार्फत मार्गदर्शन केले जाणार आहे. तर पुढील टप्प्यात अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना देखील मार्गदर्शन उपलब्ध करुन दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून, शिक्षकांचे मानधन तसेच इतर भौतिक सुविधांचा संपूर्ण खर्च अकिब सय्यद स्वतः करणार आहेत. यासाठी त्यांनी स्वतःची जागाही उपलब्ध करून दिली आहे. परदेशात राहूनही आपल्या मायदेशातील गरजू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, या सामाजिक जाणिवेतून त्यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे.

## अगस्ती विद्यालयाची सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत नेत्रदीपक कामगिरी; २० विद्यार्थी पात्र

**● अकोले । वीरभूमी–**

श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटी संचलित अगस्ती विद्यालय, अकोले येथील इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नेत्रदीपक लागला असून २० विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. या यशामुळे विद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखली आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने शासनाच्या नवीन धोरणानुसार आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यालयाने जादा तास, वैयक्तिक मार्गदर्शन, नियमित सराव परीक्षा आदी उपक्रम प्रभावीपणे राबविले. संस्थेचे संस्थापक सचिव तथा थोर स्वातंत्र्यसैनिक गुरुवर्य बा. ह. नाईकवाडी यांच्या प्रेरणेतून विद्यालयाने सातत्याने यशाचा आलेख उंचावला आहे.

विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात असून इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेतही विद्यालयाने यापूर्वी उल्लेखनीय यश मिळविले आहे.

शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेले विद्यार्थी : प्रणिती वाकचौरे, सारंगी हासे, कृष्णा सदगीर, सानिका बांबळे, अभय नवले, श्लोक चासकर, स्वराली बडे, संस्कृती दराडे, निमिष शेळके, लक्ष्मी दातखिळे, वेदिका धुमाळ, रिया मडके, श्रद्धा मंडलिक, आराध्या जोर्वेकर, स्वरांजली वाकचौरे, हर्षदा आंधळे, वेदांत चौधरी, आदित्य शिंदे, श्रेयस आभाळे आणि आयुष यादव.

या यशाबद्दल विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या सचिव शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, विद्यालयाचे प्राचार्य संजय शिंदे, उपमुख्याध्यापक तात्यासाहेब दौंड, पर्यवेक्षिका नंदा गोपाळे, शालेय व्यवस्थापन समिती तसेच शिक्षक-पालक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

## उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मूकबधिर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

### शिक्षक सेना व शिवसेनेचा समाजोपयोगी उपक्रम; वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**● पाथर्डी । वीरभूमी–**

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पाथर्डी येथील निवासी मूकबधिर विद्यालयात शिक्षक सेना व शिवसेना यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा समाजोपयोगी उपक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन व मशाल प्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना वह्या व अन्य शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

यावेळी अहिल्यानगर महानगरपालिकेचे नगरसेवक योगीराज गाडे, शिक्षक सेना जिल्हाप्रमुख अंबादास शिंदे, युवा सेना जिल्हाप्रमुख पप्पू (प्रशांत) भाले, शिवसेना तालुकाप्रमुख नवनाथराव चव्हाण, शिक्षक सेना जिल्हा सचिव उद्धवराव सोनवणे, जिल्हा उपाध्यक्ष महेश कुलकर्णी, तालुका सचिव राजू पवार, ज्येष्ठ नेते डॉ. चेमटे, शिवसेना नेते अंबादास आरोळे, युवा सेना शहरप्रमुख सचिन नागापुरे, राहुल पालवे यांच्यासह शिवसैनिक व शिक्षक सेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मनोगत व्यक्त करताना शिवसेना तालुकाप्रमुख नवनाथराव चव्हाण यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हा विचार अशा समाजोपयोगी उपक्रमांतून प्रत्यक्षात उतरविला जात असल्याचे सांगितले.

शिक्षक सेना तालुकाप्रमुख नंदकुमार डाळिंबकर यांनी उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत निवासी मूकबधिर विद्यालयात अशा सामाजिक उपक्रमांचे सातत्य राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. शिक्षक सेना जिल्हाप्रमुख अंबादास शिंदे यांनी शिक्षक सेनेचे प्रांताध्यक्ष तथा शिक्षक आमदार अभ्यंकर यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर जिल्हाभर वृक्षारोपण व शैक्षणिक साहित्य वाटपाचे



उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती दिली.

युवा सेना जिल्हाप्रमुख प्रशांत भाले यांनी विद्यार्थ्यांच्या सेवेत सहभागी होण्याची संधी मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात नगरसेवक योगीराज गाडे यांनी शिवसेना ही केवळ राजकीय संघटना नसून समाजसेवेसाठी कटिबद्ध असलेले कुटुंब असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन नागापुरे यांनी केले. नंदकुमार डाळिंबकर यांनी प्रास्ताविक केले, तर प्रा. राजू पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

ही बातमी वृत्तपत्रीय शैलीत संक्षिप्त, शुद्ध आणि आकर्षक स्वरूपात संपादित केली असून सर्व महत्त्वाचा मजकूर कायम ठेवण्यात आला आहे.

# हजारो महिला वारकऱ्यांच्या रांजणी ते मोहटादेवी दिंडीने संपूर्ण परिसर दुमदुमला

**● पाथर्डी । वीरभूमी –**

दिंडीची परंपरा राज्यात वारकरी संप्रदायापासून आहे. राज्यातील महिलांची एकमेव दिंडी म्हणून ओळखली जाणारी रांजणी ते मोहटादेवी या दिंडी सोहळ्याचे गुरुपौर्णिमेनिमित्त तालुक्यात ठीक ठिकाणी जोरदार स्वागत झाले. सायंकाळी मोहटादेवी मंदिर परिसरात रिंगण सोहळा, वारकरी सांप्रदायातील विविध पावल्या, देवीचा जयघोष, जागर, गोंधळ अशा वातावरणात हजारो महिला वारकऱ्यांमुळे संपूर्ण परिसर दुमदुमला.

गेल्या ३५ वर्षांपासून अहिल्यानगर तालुक्यातील रांजणी पासून महिलांची दिंडी मोहटादेवीला येते. यामध्ये संभाजीनगर, अहिल्यानगर बीड, जिल्ह्यातील महिला भाविकांची संख्या लक्षणीय असते. दिंडीचा पहिला मुक्काम श्री क्षेत्र मढी येथे कानिफनाथांच्या दरबारामध्ये होऊन देवस्थान समितीतर्फे तेथे सर्वांची व्यवस्था केली जाते. गुरु पौर्णिमेच्या दिवशी धामणगाव येथे फराळाचा कार्यक्रम होऊन पाथर्डी शहरातून वाजत गाजत दिंडी मोहटादेवीकडे रवाना होते.

शहरातील मिरवणूक मार्गावर भाविकांनी पालखीवर व महिला वारकऱ्यांवर पुष्पवृष्टी केली. अनेक भाविकांनी देवीची ओवाळणी करत पूजन केले. शहरातील काही चौकांमध्ये रांगोळ्या रेखाटल्या होत्या. विजय लाहोटी परिवार व अजय गांधी परिवाराकडून चहापाणी घेत दिंडी सायंकाळच्या सुमारास देवी गडावर पोहोचली. देवस्थान समितीच्या वतीने दिंडीचे पारंपारिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. यावेळी विश्वस्त अशोक दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, बाळासाहेब लाहोटी, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे, मुख्य सेवेकरी अंकुश ठोंबरे मुख्य पुरोहित भूषण साकरे, भास्कर देवा देशपांडे, आदींसह कर्मचारी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महिला भाविकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. देवीचे मुखदर्शन घेण्यासाठी प्रत्येक भाविक आतुर झाल्याने देवीचे मुखदर्शन होताच महिलांनी एकच जयजयकार केला. गुरु व मातृ स्वरूप देवीचे पूजन प्रत्येक महिलेकडून होते. दिंडीच्या संचालिका प्रयागाबाई गोरे महाराज व संयोजक रणजीत गोरे व परिवाराकडून अत्यंत परिश्रमपूर्वक श्रद्धायुक्त अंतकरणाने संयोजन केले जाते. ऊन वारा पाऊस कशाचीही तमा न बाळगता महिला वारकऱ्यांनी पार केलेले अंतर खऱ्या अर्थाने श्रद्धेचा महापूर म्हणून अनुभवाला आले.

यावेळी रणजीत गोरे म्हणाले, मोहटा देवीचे स्थान राज्यात अत्यंत जागृत समजले जाते आमच्या कुटुंबामध्ये सुद्धा देवीचे अनेक चमत्कारिक अनुभव आलेले आहेत ३५ वर्षांपासून सुरू असलेली महिलांची दिंडी खऱ्या अर्थाने श्रद्धा भक्ती व समर्पण भावनेचे प्रतीक म्हणून समजले जाते मातृ शक्तीचा अविष्कार गुरुस्थानी



समजून त्या शक्तीचे आशीर्वाद मिळावेत म्हणून दिवसेंदिवस महिलांचा सहभाग वाढत आहे. प्रयागताई गोरे महाराज यांच्यावर देवीची खास कृपादृष्टी असून त्यांची अनुभूती शब्दात वर्णन करण्यासारखी नाही. मोहटा देवस्थान म्हणजे राज्यातल्या अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रात अग्रगण्य असून ६४ योगिनी, अष्ट महासिद्धी, दशमहाविद्या यांच्या येथील अस्तित्वाने स्थान महात्म्य खूप वाढले आहे. देवस्थान समिती कडून सर्वतोपरी उत्तम सहकार्य लाभून महिला भाविकांच्या दृष्टीने सुरक्षा व्यवस्थेसह अन्य अत्यावश्यक सुविधा अत्यंत सेवाभावी पद्धतीने उपलब्ध करून दिल्या जातात. विविध गावच्या भाविकांकडून अत्यंत आदराने स्वागत केले जाऊन आवश्यक त्या सुविधा दिल्या जातात.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
✻ संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## ५ ऑगस्टला वीज कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मागण्यांसाठी राज्यव्यापी उपोषण

**● अकोले । वीरभूमी-**

राज्यातील वीज क्षेत्रातील कर्मचारी, अभियंते आणि अधिकारी यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी सरकार तसेच वीज कंपनीच्या व्यवस्थापनाविरोधात आंदोलनाचा इशारा दिला आहे. महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीने ५ ऑगस्ट रोजी महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या तिन्ही कंपन्यांच्या विभागीय कार्यालयांसमोर दिवसभर उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. अशी माहिती महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे विभागीय सचिव अमोल आभाळे यांनी दिली. कृती समितीच्या प्रमुख मागण्यांमध्ये सार्वजनिक वीज व्यवस्था अधिक सक्षम करणे, वीज वितरणाचे खासगीकरण थांबविणे, नव्या कृषी वीज धोरणातील त्रुटी दूर करणे, विद्यमान वीज प्रकल्प बंद करण्याऐवजी त्यांचे आधुनिकीकरण करून उत्पादन सुरू ठेवणे, वीजनिर्मिती क्षेत्रातील सार्वजनिक गुंतवणूक वाढविणे, जलविद्युत प्रकल्प खासगी क्षेत्राकडे वर्ग करण्याच्या प्रस्तावाला विरोध करणे तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तीवेतन, सेवा अटी, रिक्त पदे भरणे आदी प्रलंबित मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात, यांचा समावेश आहे. महाराष्ट्र वीज कामगार महासंघासह कृती समितीतील अन्य संघटनांनी इशारा दिला आहे की, ५ ऑगस्टच्या उपोषणानंतरही सरकारने मागण्यांवर सकारात्मक निर्णय न घेतल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

## राज्यस्तरीय स्केटिंग शर्यतीत अहिल्यानगर जिल्ह्याचा डंका

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

बारामती येथे पार पडलेल्या अत्यंत चुरशीच्या राज्यस्तरीय स्केटिंग शर्यतीत अहिल्यानगर जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकावून ६ फुटांची भव्य व मानाची विजेतेपदाची ढाल पटकाविली. या स्पर्धेत अहिल्यानगरच्या खेळाडूंनी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई करत जिल्ह्याचे वर्चस्व सिद्ध केले. या यशामध्ये अहिल्यानगरचा अवघ्या ८ वर्षांचा गुणवंत खेळाडू आरुष प्रविण कांबळे याने ८ वर्षांखालील गटात चमकदार कामगिरी करत कास्य पदक पटकावून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. आरुष कांबळे हा अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे सहायक महसूल अधिकारी प्रविण अंबादास कांबळे आणि स्वाती प्रविण कांबळे यांचा मुलगा आहे. अत्यंत बालवयात आरुषने या खेळात दाखवलेले कौशल्य आणि मिळवलेले हे यश सर्वांसाठीच अभिमानास्पद ठरले आहे. आई स्वाती यांचे या यशा मागे मोलाचे योगदान असल्याचे आरुष सांगतो. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या शेकडो नामांकित खेळाडूंमध्ये आरुषने अत्यंत कौशल्याने आणि जिद्दीने कामगिरी करत हे यश मिळवले आहे. या यशामागे अहिल्यानगर स्केटिंग संघटनेचे अध्यक्ष गोरख धात्रक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच मार्गदर्शक केदार सर, आदित्य पालवे आणि सर्व पालकांनी घेतलेली मेहनत या यशाची मुख्य शिल्पकार ठरली. अहिल्यानगर जिल्ह्याच्या या ऐतिहासिक विजयाबद्दल आणि बालखेळाडू आरुष कांबळे याच्या यशाबद्दल महाराष्ट्र राज्य संघटनेचे अध्यक्ष आशिष दहिफळे यांनी सर्व खेळाडू, मार्गदर्शक व पालकांचे अभिनंदन केले. तसेच राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस रावसाहेब निमसे, अध्यक्ष सुभाष तळेकर व उपाध्यक्ष अशोक मासाळ यांनी समस्त महसूल परिवार आणि राज्य सरकारी कर्मचारी संघटनेच्या वतीने बालखेळाडू आरुष कांबळे याचे विशेष कौतुक करून त्याला भविष्यातील उज्ज्वल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## फिरोदिया शिवाजियन्सने पटकाविला सरपंच चषक

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

गणेश मित्र मंडळ, सैनिक नगर आयोजित सरपंच चषक फुटबॉल स्पर्धेत फिरोदिया शिवाजियन्स एफसीने अंतिम सामन्यात सुमन एफसीचा ३-० असा पराभव करून विजेतेपद पटकावले. भुईकोट किल्ला जवळील मैदानावर रंगलेल्या या स्पर्धेत शहरातील फुटबॉलच्या संघांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता. लीग कम नॉकआऊट पद्धतीने झालेल्या या स्पर्धेत फिरोदिया शिवाजियन्स एफसीने साखळी फेरीतील तीन्ही सामने जिंकून आपल्या गटात अव्वल स्थान मिळवले. उपांत्य फेरीत सॉकर क्लबचा ४-० असा दणदणीत पराभव करत संघाने अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात सुमन एफसीवर ३-० असा विजय मिळवत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात मयूर गोरखा, दर्शन पवार आणि सूरज शर्मा यांनी प्रत्येकी एक गोल करत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. फिरोदिया शिवाजियन्स एफसीने स्पर्धेतील सर्व पाच सामने जिंकले. विशेष म्हणजे संपूर्ण स्पर्धेत संघाने एकही गोल न स्वीकारता विजेतेपद मिळवले.

# रासायनीक खतांचा तुटवडा होणार नाही याची दक्षता घ्या

### आ.आशुतोष काळेंनी दिल्या अधिकाऱ्यांना सुचना । रासायनिक खताच्या तुटवड्यावर उपाययोजना

**● कोपरगाव । वीरभूमी -**

पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी अडचणीत असताना पैशांची जुळवाजूळव करून पेरण्या केल्या. पिके चांगली आहेत मात्र गरजेच्या वेळी त्यांना रासायनीक खते कमी पडणार नाहीत याची दक्षता घ्या. युरियाची कृत्रिम साठेबाजी आपण सहन करणार नाही. माझे खतांच्या पुरवठ्याकडे लक्ष असणार आहे. खत पुरवठ्याचे योग्य नियोजन करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. अशा सुचना आमदार आशुतोष काळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

रासायनिक खत विक्रेते आणि कृषि अधिकाऱ्यांच्या संयुक्त बैठकीत ते बोलत होते. आ.आशुतोष काळे म्हणाले, जुलै महिन्याच्या सुरुवातीला चांगला पाऊस झाला. शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. पुढे पावसाबरोबरच सर्व परिस्थती अनुकूल राहील या भरवशावर नेहमीप्रमाणे फायद्या तोट्याचा विचार न करता शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या आहेत. या पिकांना वेळेवर युरियासह इतर आवश्यक रासायनिक खते उपलब्ध करून देणे ही आपली संयुक्त जबाबदारी आहे.



युरिया खताची टंचाई निर्माण झाल्यास पिकांचे मोठे नुकसान होते. शेतक-यांना मनस्ताप होतो. कृषी विभागाने मतदारसंघात नवीन पेरण्यांचा आणि पिकांचा आढावा घेऊन गरजेनुसार खतांचा अतिरिक्त साठा उपलब्ध करावा. मतदारसंघात युरिया खताची साठेबाजी, कृत्रिम तुटवडा निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी. शेतकऱ्यांची कोणत्याही प्रकारे अडचण किंवा पिळवणूक होणार नाही याकडे लक्ष द्यावे.यावेळी तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, राहाता तालुक्याचे कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, पंचायत समिती कृषी अधिकारी सचिन कोष्टी, राहुल कदम, वाळीबा उघडे, यांच्यासह कृषी सहाय्यक अशिकारी, रासायानिक खत विक्रेते, कृषीसेवा केंद्र चालक उपस्थित होते.

### शेतकऱ्यांनी पिक विमा काढावा....

■ पाऊस उशीरा झाल्याने पेरण्या महिनाभर उशिरा झाल्या. पुढे पाऊस वेळेवर आला तर पिके चांगली येतील. मात्र पावसाने पुन्हा डोळे वटारले तर उत्पादन कमी होवून नुकसान होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. हे लक्षात घेऊन कृषी विभागाने केलेल्या अवाहनाला शेतकऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद द्यावा. पिक विमा हा उत्पन्नाच्या आधारावर दिला जात असल्यामुळे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी पिक विमा काढावा.

**- आ. आशुतोष काळे**

## शहीद पतीच्या स्मृतिदिनानिमित्त अंजली जवक यांचेकडून बालघर प्रकल्पाला तीन ट्रक मुरूमांची मदत

**● अहिल्यानगर । वीरभूमी -**

शहीद पतीच्या स्मृतिदिनानिमित्त सावेडी येथील रहिवासी तथा मूळ रांजणगाव मशीद (ता. पारनेर) येथील अंजली बळवंत जवक यांनी तपोवन रस्त्यावरील बालघर प्रकल्पाला तीन ट्रक मुरूम देऊन सामाजिक बांधिलकी जपली. नव्या जागेत स्थलांतरित झालेल्या बालघर प्रकल्पाच्या मैदानाच्या विकासासाठी ही मदत करण्यात आली.

अंजली जवक यांचे पती बळवंत सुखदेव जवक पाच वर्षांपूर्वी शहीद झाले. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त गरजूंना मदत करण्याचा संकल्प त्यांनी केला होता. त्यानुसार बालघर प्रकल्पाला ही मदत देण्यात आली. यावेळी अंजली जवक, आकांक्षा जवक, सामाजिक कार्यकर्त्या शितल दळवी, बालघर प्रकल्पाचे संस्थापक युवराज गुंड, सहायक रुक्मिणी ठोंबरे आदी



उपस्थित होते.

गरजू मुलांचे संगोपन करणारा 'बालघर प्रकल्प' नुकताच पूर्वीच्या जागेजवळील छत्रपती चौक परिसरात स्थलांतरित झाला आहे. नव्या ठिकाणी विविध विकासकामांसाठी निधीची आवश्यकता असल्याचे लक्षात घेऊन अंजली जवक यांनी मैदानासाठी तीन ट्रक मुरूम उपलब्ध करून दिला.

यावेळी अंजली जवक म्हणाल्या, समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो. गरजूंना मदतीचा हात देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. त्याच भावनेतून बालघर प्रकल्पासाठी ही छोटीशी मदत केली.

बालघर प्रकल्पाचे संस्थापक युवराज गुंड म्हणाले की, अंजली जवक यांनी दिलेली मदत प्रकल्पासाठी अत्यंत मोलाची आहे. नव्या ठिकाणी अनेक विकासकामे प्रलंबित असून त्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती आणि संस्थांनीही सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

## संवत्सरच्या युवकांकडून वारकऱ्यांसाठी केळी-लाडू वाटप

**● कोपरगाव । वीरभूमी-**

आषाढी शुद्ध एकादशीच्या पावन निमित्ताने श्री क्षेत्र संवत्सर ते श्री क्षेत्र सद्गुरु जनार्दन स्वामी महाराज आश्रम दरम्यान आयोजित भव्य पायी दिंडी सोहळ्यात संवत्सर गावातील युवकांनी वारकरी व भाविकांसाठी केळी आणि लाडूंचे वाटप करून सेवाभावाचा आदर्श घालून दिला.



शनिवार, दि. २५ जुलै रोजी सकाळी ८ वाजता श्री क्षेत्र कमळादेवी मंदिर, संवत्सर येथून दिंडीचे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. टाळ-मृदंगाच्या गजरात, विठ्ठल नामाच्या अखंड जयघोषात आणि अभंगांच्या सुरेल निनादात वारकरी मोठ्या उत्साहाने मार्गक्रमण करत होते. वाटेत भाविकांना केळी व लाडूंचे वाटप करण्यात आले.

या सेवा उपक्रमासाठी कोपरगाव संजीवनी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र परजणे, भारतीय जनता पक्ष दिव्यांग सेलचे तालुकाध्यक्ष मुकुंद काळे, संवत्सर ग्रामपंचायत सदस्य महेश परजणे, भाजप पूर्व मंडळ युवा मोर्चाचे सदस्य सचिन शेटे यांच्यासह अनिल भाकरे, विजयराव काळे, चिमाजी दैने, दिनेश बोरनारे, मोहन निकम, अनुप शिंदे, योगेश परजणे, गणेश दैने, नरहरी साबळे, मच्छिंद्र परजणे, यादव दैने, गोकुल मोरे, रवी सोनवणे, विशाल कासार, आप्पासाहेब रानोडे, युवा भाकरे, बाळासाहेब निरगुडे, सचिन भाकरे, योगेश भाकरे, जितेंद्र सोनवणे, सुजित सोनवणे, शंकर पुंड, श्लोक काळे, हेमंत काळे, किरण निरगुडे, संतोष कहाटे, आण्णासाहेब निरगुडे, लहानू गुंड, ज्ञानेश्वर निरगुडे, नानासाहेब सोनवणे, नाना ढेपले, गणेश कोताडे, ह.भ.प. कर्पे महाराज, राजेंद्र कापसे, राजेंद्र भोकरे, वैभव भोसले, शिवाजी घेर, अनिल हिंगे, पुंडलिक गिते, संदीप सोनवणे, धीरज कासार आणि ऋषीकेश वरगुडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अहिल्यानगर जिल्हा लोहार समाज संघटनेच्या अध्यक्षपदी भास्कर पोपळघट बिनविरोध



**● पारनेर । वीरभूमी-**

अखिल लोहार समाज विकास संस्था, महाराष्ट्र राज्याची महत्त्वपूर्ण प्रतिनिधी बैठक नुकतीच पुणे येथे संस्थेचे राज्याध्यक्ष संदीप थोरात यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत अहिल्यानगर जिल्हा लोहार समाज संघटनेच्या अध्यक्षपदी भास्कर पोपळघट यांची एकमताने निवड करण्यात आली.

बैठकीस राज्य उपाध्यक्ष विश्वनाथ लोखंडे, सचिव डॉ. मुकुंद लोखंडे, मनोज थोरात, खजिनदार निवृत्ती पोपळघट, पुणे जिल्हाध्यक्ष भरत थोरात, संस्थापक सदस्य नवनाथ हराळे, बाळासाहेब इघे, सुभेदार किसनराव पखाले, उद्योजक बाळासाहेब चव्हाण, किसनराव लोखंडे, दत्ताभाऊ जगताप, विजयकुमार जगताप, गुलाब चव्हाण, प्रसिद्धी प्रमुख सौ. रोहिणीताई हराळे यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

राज्याध्यक्ष संदीप थोरात यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, राज्यातील लोहार समाजाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती चिंताजनक असून समाजातील युवकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविण्यासह प्रलंबित मागण्यांसाठी पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष भास्कर पोपळघट यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा व तालुकास्तरावर समित्या स्थापन करून संघटना अधिक बळकट केली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष भास्कर पोपळघट यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या 'ब्रह्मलीन आचार्य दिव्यानंद महाराज आर्थिक विकास महामंडळा' च्या माध्यमातून तरुणांना उद्योगासाठी कर्ज मिळावे, अशी अपेक्षा होती. मात्र राष्ट्रीयीकृत बँकांच्या जाचक अटींमुळे अनेकांना त्याचा लाभ मिळत नाही. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सुपा एमआयडीसीमध्ये जागेची मागणी करून 'विश्वकर्मा औद्योगिक सोसायटी' स्थापन करण्याचा मानस आहे.

यावेळी जिल्ह्यातील लोहार समाजाच्या संघटनात्मक इतिहासाचाही आढावा घेण्यात आला. सन २००२ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या उपस्थितीत आणि समाजनेते स्वर्गीय साथी हौशिनाथ पोपळघट यांच्या पुढाकाराने झालेल्या राज्यस्तरीय अधिवेशनामुळे लोहार समाजाचा एन.टी.बी. प्रवर्गात समावेश झाला आणि विद्यार्थ्यांना शिक्षण व नोकरीत मोठा लाभ मिळाला. मात्र त्यानंतर संघटनात्मक कामकाजात काहीशी मरगळ आल्याचेही नमूद करण्यात आले.

संस्थेचे कार्याध्यक्ष नवनाथ हराळे यांनी जिल्ह्यातील प्रमुख ठिकाणी लोहार समाजासाठी सुसज्ज 'लोहार समाजभवन' उभारण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून प्रभावी पाठपुरावा करण्यात येईल, असा संकल्प व्यक्त केला.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

# शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमतेकडे वाटचाल

**राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा देऊन त्यांना पुन्हा पीक कर्जासाठी पात्र करणे, नियमित कर्जफेडीला प्रोत्साहन देणे आणि संपूर्ण प्रक्रिया डिजिटल व पारदर्शक पद्धतीने राबविणे, हा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ चा मुख्य उद्देश आहे. सुमारे रूपये ३६ हजार ५८५ कोटींची तरतूद आणि ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देणारी ही योजना ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारी ठरत आहे.**

महाराष्ट्रातील शेती नैसर्गिक आपत्ती, हवामानातील बदल आणि बाजारातील अनिश्चिततेमुळे अनेकदा संकटात सापडते. कर्जाची परतफेड न झाल्यास शेतकरी नव्याने पीक कर्ज घेण्यास अपात्र ठरतो आणि शेतीतील गुंतवणूक कमी होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ही योजना सुरू केली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याला अभिवादन म्हणून या योजनेला त्यांचे नाव देण्यात आले आहे.

**योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये**

या योजनेसाठी सुमारे रूपये ३६ हजार ५८५ कोटींची आर्थिक तरतूद करण्यात आली असून सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जांचा यामध्ये समावेश आहे. ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पात्रता कर्जांना या योजनेचा लाभ मिळेल.

योजनेत रूपये २ लाखांपर्यंत थेट कर्जमुक्ती, दोन लाखांपेक्षा जास्त थकीत कर्जासाठी वन टाइम सेटलमेंट (ओटीएस) सुविधा आणि नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांसाठी रूपये ५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. जमीनधारणेची कोणतीही अट नसून राष्ट्रीयकृत, खाजगी, प्रादेशिक ग्रामीण, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि प्राथमिक कृषी पतसंस्थांकडील पात्र पीक कर्जांचा समावेश करण्यात आला आहे.

**तंत्रज्ञानाधारित आणि पारदर्शक प्रक्रिया**

योजनेची अंमलबजावणी महाआयटी विकसित डिजिटल प्रणालीद्वारे केली जात आहे. बँका, महसूल विभाग, आयकर विभाग आणि इतर शासकीय यंत्रणांकडील माहिती एकत्रित करून पात्र लाभार्थ्यांची यादी सॉफ्टवेअरच्या माध्यमातून तयार करण्यात आली आहे. त्यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढली आहे.

पात्र शेतकऱ्यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. कर्जाच्या माहितीत तफावत असल्यास त्याच ठिकाणी ऑनलाइन तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध आहे.

**तक्रार निवारण आणि प्रशासनाची जबाबदारी**

योजनेसाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही प्रकारची तक्रार निवारण व्यवस्था उभारण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक, मुख्य कार्यकारी अधिकारी, बँकांचे प्रतिनिधी आणि लीड बँक व्यवस्थापक यांच्या सहभागातून जिल्हास्तरीय समित्या तक्रारींचे निवारण करतात. ज्या शेतकऱ्यांचे नाव पहिल्या यादीत नाही, त्यांनी पुढील याद्यांची प्रतीक्षा करावी. त्यानंतरही नाव न आल्यास संबंधित तहसील कार्यालय किंवा जिल्हा उपनिबंधकांकडे लेखी तक्रार करता येते.

**गरजवंतांनाच लाभ**

योजनेचा लाभ खऱ्या अर्थाने गरजू शेतकऱ्यांना मिळावा, यासाठी काही घटकांना अपात्र ठरविण्यात आले आहे. विद्यमान व माजी मंत्री, आमदार, उच्च वेतनधारक शासकीय अधिकारी-कर्मचारी, आयकर निकषांनुसार अपात्र व्यक्ती आणि शासनाने निश्चित केलेल्या इतर घटकांना या योजनेतून वगळण्यात आले आहे.

**अहिल्यानगर जिल्हा आघाडीवर**




पहिल्या टप्प्यात राज्यातील सुमारे १७ लाख पात्र शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील २ लाख ३३ हजार ७११ कर्जखात्यांपैकी १ लाख ३२ हजार ७३४ शेतकरी पात्र ठरले असून त्यांना सुमारे रूपये १ हजार २७८ कोटींचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे राज्यात सर्वाधिक पात्र लाभार्थी असलेल्या जिल्ह्यांमध्ये अहिल्यानगरचा समावेश झाला आहे.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना**

कर्जमुक्तीनंतर शेतकरी पुन्हा पीक कर्जासाठी पात्र होणार असल्याने बियाणे, खते, औषधे आणि शेतीसाठी आवश्यक भांडवल वेळेत उपलब्ध होईल. यामुळे शेतीतील गुंतवणूक, उत्पादनक्षमता आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. ओटीएसद्वारे कर्जबाजारी शेतकऱ्यांनाही नव्याने आर्थिक संधी उपलब्ध होणार आहे. भविष्यात 'को-ऑपरेटिव्ह स्टॅक'सारख्या डिजिटल प्रणालीद्वारे कर्जपुरवठा आणि सहकार व्यवस्थेचे अधिक प्रभावी नियोजन करण्यावर शासन भर देत आहे.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ही केवळ कर्जमाफीची योजना नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना पुन्हा औपचारिक बँकिंग व्यवस्थेशी जोडण्याचा व्यापक उपक्रम आहे. तंत्रज्ञानाधारित अंमलबजावणी, पारदर्शक प्रक्रिया, सक्षम तक्रार निवारण व्यवस्था आणि नियमित कर्जफेडीला प्रोत्साहन यामुळे ही योजना ग्रामीण विकासाला बळ देणारी ठरत आहे. पात्र शेतकऱ्यांनी वेळेत आधार प्रमाणीकरण पूर्ण करून अधिकृत माध्यमांवर विश्वास ठेवत योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन शासनाने केले आहे. शासन, प्रशासन, बँका आणि शेतकरी यांच्या समन्वयातून सक्षम शेतकरी, समृद्ध शेती आणि अधिक बळकट ग्रामीण अर्थव्यवस्था घडविण्याच्या दिशेने ही योजना महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

**- सुरेश पाटील,**
प्र. जिल्हा माहिती अधिकारी, अहिल्यानगर

# पुनर्वसन रखडल्याने शेवगावच्या टपरीधारकांचा एल्गार

## जिल्हा परिषदेवर धरणे आंदोलनाचा इशारा । अतिक्रमण कारवाईनंतर शेकडो कुटुंबांचा रोजगार हिरावला । 'बीओटी' शॉपिंग कॉम्प्लेक्सचा प्रस्ताव मंजूर करावा

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** शेवगाव नगरपरिषदेने दोन महिन्यांपूर्वी राबविलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर बाधित झालेल्या टपरीधारकांचे अद्याप पुनर्वसन न झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. पर्यायी जागा उपलब्ध करून न देता टपऱ्या हटविल्यामुळे शेकडो कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. याच्या निषेधार्थ शेवगाव टपरीधारक पुनर्वसन कृती समितीने तातडीने निर्णय न झाल्यास अहिल्यानगर जिल्हा परिषद मुख्यालयावर धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

यासंदर्भातील निवेदन माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. हर्षदा काकडे व ॲड. शिवाजीराव काकडे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांच्यासह शेकडो व्यापारी उपस्थित होते. जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभागाचे कार्यकारी अभियंता सिद्धार्थ वाव्हुळे यांनी निवेदन स्वीकारले.

निवेदनात म्हटले आहे की, शेवगाव येथील क्रांती चौकातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (गट क्र. १६२९) आणि प्राथमिक आरोग्य केंद्र (गट क्र. १०२६) परिसरात अनेक व्यापारी अनेक वर्षांपासून व्यवसाय करत होते. मात्र, नगरपरिषदेने कोणतीही पर्यायी व्यवस्था न करता अचानक अतिक्रमण हटाव कारवाई केल्याने त्यांचा रोजगार बंद झाला आहे. बहुतांश व्यापारी वयोवृद्ध असून त्यांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे.

टपरीधारकांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी तत्कालीन जिल्हा परिषद सदस्या सौ. हर्षदा काकडे यांच्या पुढाकाराने १० जानेवारी २०२३ रोजी शासनाकडे 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' (इजढ) तत्त्वावर शॉपिंग कॉम्प्लेक्स व 'पे अँड पार्क' उभारण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावासाठी आवश्यक मोजणी, नकाशे, आराखडे आणि अंदाजपत्रकासह सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्या असूनही काही राजकीय व स्वार्थी हितसंबंधांमुळे हा



प्रस्ताव रखडल्याचा आरोप कृती समितीने केला आहे.

तसेच, क्रांती चौकातील जिल्हा परिषद शाळेची इमारत धोकादायक झाल्याने ती पाडण्याचे आदेशही प्राप्त झाले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून सनदशीर मार्गाने पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून केवळ आश्वासने मिळत असल्याने व्यापाऱ्यांनी आता 'करो या मरो'ची भूमिका घेतली आहे. पुनर्वसनाबाबत तातडीने निर्णय न झाल्यास जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

यावेळी मोहोम्मद तांबोळी, भाऊसाहेब भाग्यवंत, किशोर गरंडवाल, राजू वाकळे, अर्जुन गुजर, राजेंद्र बाहेती, विजय झेंडे, बबन घुगे, राधेश्याम मुंदडा यांच्यासह शेकडो टपरीधारक व व्यापारी उपस्थित होते.

### शहर विकासासह पुनर्वसनाचा मार्ग

■ कृती समितीच्या मते, संबंधित जागेवर 'बीओटी' तत्त्वावर शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारल्यास टपरीधारकांना अधिकृत व्यवसायाची जागा मिळेल. तसेच क्रांती चौकातील वाहतूक कोंडी, अनधिकृत पार्किंग आणि अतिक्रमणाचा प्रश्नही कायमस्वरूपी सुटण्यास मदत होईल. त्यामुळे कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता प्रशासनाने हा प्रस्ताव तातडीने मंजूर करावा, अशी मागणी करण्यात आली.

# गुरुपौर्णिमा केवळ एक दिवस नव्हे, गुरूंचा सन्मान वर्षभर करा

## डॉ. अनिल रहाणे । आनंदगड शैक्षणिक संकुलात उत्साहात गुरुपौर्णिमा साजरी

**● अकोले । वीरभूमी–** आई-वडील आणि गुरू यांचे जीवनातील स्थान अनन्यसाधारण असून त्यांचे स्मरण व पूजन केवळ गुरुपौर्णिमेलाच न करता वर्षभर त्यांच्या संस्कारांनुसार आचरण केले पाहिजे, असे प्रतिपादन आनंदगड शैक्षणिक संकुलाचे संस्थापक सचिव डॉ. अनिल रहाणे यांनी केले.

वीरगाव येथील आनंदगड शैक्षणिक संकुलातील धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मीडियम स्कूल, आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज आणि मातोश्री राधा फार्मसी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अनिल रहाणे होते.



यावेळी संकुलाचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, संचालिका सौ. सुप्रिया वाकचौरे, सौ. गीता रहाणे, अक्षय रहाणे, शिवराज वाकचौरे, प्राचार्य किरण चौधरी, विनोद गिरी, प्राचार्या डॉ. पल्लवी फलके, समन्वयक विद्याचंद्र सातपुते, अधीक्षक रवींद्र आंबरे, कॅम्पस डायरेक्टर प्रा. संदीप थोरात, सुपरवायझर सौ. अलका आहेर, सौ. पिंगला तोरमल, लक्ष्मण कवडे, कार्यालयीन अधीक्षिका सौ. सीमा दिघे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महर्षी व्यास, धर्मवीर आनंद दिघे, साईबाबा आणि सरस्वती यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मनोगतातून गुरूंचा महिमा आणि गुरुपौर्णिमेचे महत्त्व विशद केले.

शिक्षक प्रतिनिधी सौ. पिंगला तोरमल, प्रा. झर्येज बागवान आणि प्रा. घोलप यांनी गुरूंचे जीवनातील महत्त्व अधोरेखित करत, गुरूच योग्य दिशा देतात व त्यांचा सन्मान प्रत्येकाने केला पाहिजे, असे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. अनिल रहाणे म्हणाले की, महर्षी व्यास यांनी जगाला वेदांची अमूल्य देणगी दिली. जीवनात ज्या व्यक्तीकडून काही शिकायला मिळते ती व्यक्ती आपली गुरू असते. गुरूंना वयाचे बंधन नसते. ते योग्य मार्ग दाखवतात आणि ध्येयपूर्तीसाठी प्रेरणा देतात. विद्यार्थ्यांनी आई-वडिलांना गुरुस्थानी मानून दररोज त्यांना नमस्कार करावा. शिक्षकांचा सन्मान केवळ शिक्षक दिन किंवा गुरुपौर्णिमेलाच नव्हे, तर प्रत्येक दिवशी केला पाहिजे. गुरू म्हणजे जीवनाची खरी ताकद असून त्यांचा आदर करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इच्छा देशमुख व ईश्वरी देशमुख यांनी केले. प्रास्ताविक आराध्या देशमुख हिने, तर आभार सुशांत गिरी याने मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वयम चौधरी, श्राव्य लांडगे, साई सोनवणे, नैतिक बाळसराफ तसेच सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल स्पर्धेत आयकॉन पब्लिक स्कूल व आठरे पाटील स्कूलची विजयी घोडदौड

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत बुधवारी (दि. २९ जुलै) विविध वयोगटांतील अत्यंत चुरशीचे सामने रंगले. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या सामन्यांमध्ये युवा खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कौशल्याची चुणूक दाखवली. दिवसातील सामन्यांमध्ये आयकॉन पब्लिक स्कूल आणि आठरे पाटील स्कूल या संघांनी आपली विजयी घोडदौड कायम ठेवत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवले. त्याचबरोबर सेक्रेडहार्ट कॉन्व्हेंट आणि ऊर्जा गुरुकुलच्या संघांनीही दमदार कामगिरी करत विजयाची नोंद केली.

दिवसभर रंगलेल्या सामन्यांमध्ये गोलसाठी झालेली चुरस, बचावफळीची भक्कम कामगिरी आणि शेवटच्या मिनिटापर्यंत कायम राहिलेली उत्कंठा यामुळे मैदानावर उपस्थित क्रीडाप्रेमींना दर्जेदार फुटबॉलचा आनंद अनुभवायला मिळाला.

सकाळच्या सत्रात १४ वर्षांखालील गटात सेक्रेडहार्ट कॉन्व्हेंट स्कूल आणि ऊर्जा गुरुकुल यांच्यात झालेला सामना अत्यंत रंगतदार ठरला. दोन्ही संघांनी सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत गोल करण्यासाठी जोरदार प्रयत्न केले. मात्र सामन्याच्या ४७व्या मिनिटाला सेक्रेडहार्ट कॉन्व्हेंटच्या स्तवन वडागळे याने केलेला निर्णायक गोल अखेर विजयाचा पाया ठरला. ऊर्जा गुरुकुलला एकही गोल करू न देता सेक्रेडहार्ट कॉन्व्हेंटने १-० असा निसटता विजय मिळवला.

१६ वर्षांखालील मुलींच्या गटात ऊर्जा गुरुकुल आणि आयकॉन पब्लिक स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात दोन्ही संघांनी उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन केले. सामन्याच्या १६व्या मिनिटाला ऊर्जा गुरुकुलच्या शौर्या बेरड हिने शानदार गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर बचावफळीने भक्कम खेळ करत आयकॉन पब्लिक स्कूलला एकही गोल करू दिला नाही. त्यामुळे ऊर्जा गुरुकुलने १-० असा महत्त्वपूर्ण विजय मिळवला.

१४ वर्षांखालील गटात आयकॉन पब्लिक स्कूल आणि अशोकभाऊ फिरोदिया स्कूल यांच्यात झालेल्या सामन्यात आयकॉनने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला. सामन्याच्या १४व्या मिनिटाला लोकेश मुनोत याने गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर आयकॉनच्या बचावफळीने उत्कृष्ट कामगिरी करत प्रतिस्पर्धी संघाला गोल करण्याची एकही संधी दिली नाही. परिणामी आयकॉन पब्लिक स्कूलने १-० असा विजय नोंदवला.

# शेवगावात भरदिवसा घरफोडी; ११ लाखांचा ऐवज लंपास

## खंडोबानगरातील बंद घर चोरट्यांनी फोडले; सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी

**● शेवगाव । वीरभूमी –** शेवगाव शहरातील खंडोबानगर परिसरात भरदिवसा बंद घर फोडून चोरट्यांनी सुमारे १० ते ११ लाख रुपयांचा ऐवज लंपास केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (ता. २८) घडली. या घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

बाळासाहेब भारदे हायस्कूलचे माजी प्राचार्य शिवदास दगडू सरोदे हे पत्नी व मुलासह न्यायालयीन कामानिमित्त अहिल्यानगर येथे गेले होते. त्यांचा मुलगा अजित सरोदे हा आखेगाव रोडवरील आपल्या दुकानात गेला होता, तर सून प्रणाली सरोदे मुलांना शाळेत सोडण्यासाठी घराला कुलूप लावून बाहेर गेल्या होत्या.

याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी घराच्या गेटमधून प्रवेश करून मुख्य दरवाजावरील कोंडा तोडला. त्यानंतर घरातील कपाटाचे लॉकर फोडून अंदाजे आठ ते दहा तोळे सोन्याचे दागिने आणि सुमारे तीन लाख रुपयांची रोख रक्कम असा एकूण १० ते ११ लाख रुपयांचा ऐवज लंपास केला. चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये अंगठ्या, कानातील झुंबर, गळ्यातील चेन, मंगळसूत्र आदींचा समावेश आहे.

ही चोरी दुपारी सुमारे ११ ते १ वाजण्याच्या दरम्यान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. घटनेची माहिती मिळताच शेवगाव पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांनी घटनास्थळी भेट दिली. नगर येथील ठसेतज्ज्ञांना पाचारण करण्यात आले असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यासह आरोपींचा शोध सुरू करण्यात आला आहे.

या प्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. भर मध्यवस्तीत भरदिवसा झालेल्या या धाडसी घरफोडीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांनी दिवसा व रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# गुरुपौर्णिमा म्हणजे भारतीय संस्कृतीतील ज्ञान, संस्कार आणि कृतज्ञतेचा पवित्र उत्सव

## नगराध्यक्ष अभय आव्हाड । श्री विवेकानंद विद्यामंदिर येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**● पाथर्डी । वीरभूमी –** गुरु म्हणजे केवळ धडा शिकवणारा शिक्षक नव्हे; तर विद्यार्थ्याच्या आयुष्याला दिशा देणारा, व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा आणि माणूसपण जागवणारा दीपस्तंभ होय.असे प्रतिपादन पार्थ नगरीचे नगराध्यक्ष तथा संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.




शहरातील श्री विवेकानंद विद्यामंदिर येथे विविध कार्यक्रम आयोजित करून गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड म्हणाले, की भारताची ओळख जगाला अनेक कारणांनी आहे. विविधतेने नटलेली संस्कृती, समृद्ध अध्यात्म, महान संतपरंपरा आणि हजारो वर्षांची ज्ञानपरंपरा ही आपल्या देशाची खरी संपत्ती आहे. या ज्ञानपरंपरेचा आत्मा जर कोणामध्ये वसला असेल, तर तो गुरु या संकल्पनेत आहे. भारतीय संस्कृतीने गुरुचे स्थान इतके उंच मानले की, देवापर्यंत पोहोचण्याचा मार्गही गुरुंच्या चरणांतून जातो, असे सांगितले. म्हणूनच आषाढ पौर्णिमेला साजरी होणारी गुरुपौर्णिमा ही केवळ एक धार्मिक परंपरा नसून, ती ज्ञान, संस्कार आणि कृतज्ञतेचा उत्सव आहे. अपयशाने खचलेल्या विद्यार्थ्याच्या पाठीवर विश्वासाने ठेवलेला शिक्षकाचा हात त्याला पुन्हा उभे राहण्याची ताकद देतो. प्रोत्साहनाचा एक शब्द, कौतुकाची एक नजर किंवा वेळेवर दिलेला योग्य सल्ला विद्यार्थ्याचे संपूर्ण आयुष्य बदलू शकतो. म्हणूनच शिक्षकांना समाजाचे शिल्पकार म्हटले जाते.

कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड, अनुलोम संस्थेच्या तालुकाप्रमुख मेघा चिंतामणी,मुख्याध्यापक शरद मेढे, ज्ञानेश्वर गायके, अनुजा कुलकर्णी, संपत घारे, रेश्मा सातपुते, शितल आंधळे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बालवाडी विभागा मध्ये सर्व विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांचे पाद्यपूजन कार्यक्रम आयोजित केल्याने सर्व पालक अत्यंत भावुक झाली होती. तसेच प्राथमिक व माध्यमिक विभागात वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली यामध्ये विद्यालयातील ६७ विद्यार्थ्यांनी गुरुबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# देवठाणमध्ये जागतिक व्याघ्र दिनानिमित्त जनजागृती; बिबट्यापासून बचावासाठी मार्गदर्शन

## वनविभाग, ग्रामपंचायत व जनसेवा ग्रामविकास मंडळाचा संयुक्त उपक्रम । नागरिक व विद्यार्थ्यांना सतर्कतेचा संदेश

**● अकोले । वीरभूमी –** देवठाण येथे वनविभाग, ग्रामपंचायत देवठाण आणि जनसेवा ग्रामविकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक व्याघ्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेत वाघ व बिबट्यापासून संरक्षणाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. विजया सहाणे होत्या. प्रमुख उपस्थिती अमरजीत पवार (सहाय्यक वनसंरक्षक, संगमनेर), पी. एस. डोंगरे (वनक्षेत्रपाल, रो.ह.यो., अकोले), अरुण शेळके (माजी सदस्य, पंचायत समिती, अकोले) तसेच उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सी. एम. सहाणे यांची होती. सूत्रसंचालन रोकडे मॅडम यांनी केले, तर प्रास्ताविक अरुण शेळके यांनी केले.

सहाय्यक वनसंरक्षक अमरजीत पवार यांनी सांगितले की, परिसरात ऊस, गिन्नी गवत, फळझाडे आणि डोंगराळ भाग मोठ्या प्रमाणात असल्याने बिबट्यांच्या वास्तव्याला पोषक वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी रात्री लहान मुलांना अंगणात एकटे खेळू देऊ नये, जनावरांचे गोठे मजबूत व बंदिस्त ठेवावेत तसेच विद्यार्थ्यांनी शाळेत ये-जा करताना समूहाने किंवा पालकांसोबत प्रवास करावा. बिबट्या आढळल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख वक्ते आर.वाय.डी.ई.एस. चे संचालक विवेक दातीर यांनी बिबट्यापासून स्वतःचे, लहान मुलांचे आणि पाळीव जनावरांचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. त्यांनी नागरिकांनी एकटे फिरणे टाळावे, गोठे सुरक्षित ठेवावेत, अंधारात समूहाने प्रवास करावा, हातात काठी व टॉर्च ठेवावी, बिबट्या समोर आल्यास घाबरून पळू नये, शांत राहून स्वतःचा आकार मोठा दिसेल असा प्रयत्न करावा, असे सांगितले. तसेच घराजवळील झुडपे, कचरा व आडगळ हटवून परिसर स्वच्छ ठेवावा, भटक्या कुत्र्यांची संख्या वाढू देऊ नये आणि गोठ्याभोवती रात्री प्रखर प्रकाश व्यवस्था ठेवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.



यावेळी भारत सहाणे (चेअरमन), सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र कराड, किसन काकड, अब्दुल इनामदार, अनिल सहाणे, जालिंदर येलमामे, राधाकृष्ण जोरवर, राधाकिसन शेळके, दत्तात्रय शेळके, बाबू दराडे, बाळासाहेब शेळके, किरण शेळके, नवनाथ शेळके, शुभम जोरवर, निवृत्ती शेळके, शिवाजी पाटोळे, केशव बोडके, सुभाष दराडे, मच्छिंद्र काळे, विठ्ठल शेळके, भास्कर शेळके, रामदास काळे, सुभाष सहाणे, संदीप कराड, संजय शेळके, संजय बोडके, प्रसाद सहाणे, गणेश वाकचौरे, सार्थक सहाणे, कैलास दराडे, मच्छिंद्र सोनवणे, विजय शेळके, रामा बोडके, यशवंत पथवे, नंदू फोडसे, केशव मेंगाळ, अशोक काळे, नामदेव सहाणे, भीमा शेळके, बबन जोरवर, तानाजी पथवे यांच्यासह वनविभागाचे एस. के. बडे, टी. एन. नाडेकर, एस. टी. डगळे, एम. जे. तांबे, बी. टी. मंडलिक, बी. एन. थोरात, एन. एस. काळे, एस. ए. पथवे आदी कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरुण शेळके, अनिल सहाणे तसेच सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.